भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(दुपार)

जा.क्र. १५/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक ०६ /०१/२०१७

**१) ट्रक चालकाने मोटार सायकलला धडक दिल्याने, एक जखमी :—**

दिनांक ०५/०१/२०१७ चे १७.३० वा. दर. यातील फिर्यादी माणीक शंकर मंडपे वय ५६ वर्ष, रा. आंबेडकर वार्ड, सोमवारी वार्ड पवनी हा आपल्या मोटार सायकल क्र. एमएच ३६ एन ७८१९ स्प्लेंन्डर नी बेटाळा पेट्रोल पंप येथुन पेट्रोल भरुन पवनी येथे परत येत असतांना यातील आरोपी चालकांनी आपल्या ताब्यातील ट्रक हयगयीने व निष्काळजीपणे चालवुन मोटार सायकल यास निलतारा हॉटेल समोर पवनी येथे धडक दिल्याने फिर्यादी हा रोडवर पडुन जखमी करण्यास कारणीभुत झाल्याने फिर्यादीचे बयान व डॉ. रिपोर्ट वरुन पोस्टे पवनी येथे कलम २७९,३३७ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनी. डहाके पोलीस स्टेशन पवनी हे करीत आहेत.

**२) दारूडया वाहन चालकावर कारवाई . :—**

दिनांक ०५/०१/२०१७ चे ११.०० वा. दर. यातील आरोपीने आपल्या ताब्यातील मोटार सायकल क्र. एमएच ३६ एन ५६१७ चा चालक विनोद शंकर कुंभरे वय २७ वर्ष, रा. गौतम वार्ड पवनी हा आपले मोटार सायकल सह रस्त्याचे कडेला उभा असतांना यातील आरोपीने दारु सेवन करुन आपल्या ताब्यातील मोटार सायकलने मागेहुन धडक दिल्याने तसेच वैदयकिय तपासणी ग्रारु पवनी येथील डॉ. नी केली असता दारुचे सेवन केल्याचे अहवाला पोलीस स्टेशन पवनी येथे कलम १८५ मोवाका. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सपोनी. चौधरी पोलीस स्टेशन पवनी हे करीत आहेत.

**३) आजाराला कंटाळुन विहीरीच्या पाण्यात बुडुन युवकांचा मृत्यु :—**

दिनांक ०५/०१/२०१७ रोजी ०८.०० वा. दर. यातील मृतक दिनेश यशवंत मखरे वय २८ वर्ष, रा. खैरी याने शौचास जातो म्हणुन घरुन निघुन गेला तो घरी परत आला नाही त्याचा शोध घेतला असता रामकृष्ण नत्थु मेश्राम रा. कवडसी याचे शेतातील विहीरीतील पाण्यात आधार कार्ड तरगंत दिसल्याने जाळ टाकुन पाण्यात पाहीले असता मृतक यांचे प्रेत मरण पावलेल्या स्थितीत आढळुन आले. मृतकला आजर असल्यामुळे औषधी घेत होता त्या आजाराला कंटाळुन आत्महत्या केली. असे फिर्यादी भागवत शिवाजी मखरे वय ३८ वर्ष, रा. खैरी यांचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन पालांदुर येथे कलम १७४ जाफौ. अन्वये मर्ग दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. चोले पोलीस स्टेशन पालांदुर हे करीत आहेत.

**४) मोटार वाहन कायद्याखाली कारवाई. :—**

दिनांक ०५/०१/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायद्याखाली ५७ प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून त्यापैकी, तिन सिटर वाहनांवरती १० केसेस व तसेच ईतर वाहनांवरती ४७ केसेस करण्यात आलेल्या आहे.

पोलीस अधीक्षक कार्यालय भंडारा (म.रा.)

(बी. आर. गाडे)
प्रभारी पोलीस उपअधिक्षक(गृह)
भंडारा करीता
दुरध्वनी.क्र. ८८०५१०१११२

६/१/१७

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.